प्रेस नोट                    दिनांक २७.०८.२०१९

लोकसेवक गोवर्धन नरहरी धपाटे, वय ५७ वर्षे, ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, ता.केज जि.बीड वर्ग ३. यांनी ३०००/- रूपये स्विकारतांना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड. |
| गुन्हा नोंद कमांक | पो.स्टे. केज येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया चालु आहे. |
| कलम | कलम ७, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (सुधारित अधिनियम २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | गोवर्धन नरहरी धपाटे, वय ५७ वर्षे, ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, ता.केज जि.बीड. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू ३,०००/- |
| थोडक्यात माहिती | तकारदार यांनी दि.२६.०८.२०१९ रोजी असीबी कार्यालय, बीड येथे तकार दिली की, तकारदार यांचे महाराष्ट्र ग्रामीण हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या विहरीच्या बिलाच्या मस्टरवर सही करण्यासाठी पंचायत समिती कार्यालय केज येथील गोवर्धन धपाटे हे ३०००/- रूपये लाचेची मागणी करीत आहेत. तकारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तकार दिली.<br>सदर तकारीचे अनुषंगाने दि.२६.०८.२०१९ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे गोवर्धन धपाटे यांनी तकारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी ३,००० रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरुन आज दि.२७.०८.२०१९ रोजी लाचेच्या सापळयाचे आयोजन करून लाच रक्कम ३०००/- रूपये स्विकारताना गोवर्धन धपाटे रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचेविरुध्द पोस्टे केज येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालु आहे. |

सदरची कारवाई मा.श्री. अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, मा.डॉ. अनिता जमादार, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली श्री. हनपुडे पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि बीड व सापळा अधिकारी पोनि गजानन वाघ, व टीम ला.प्र.वि.बीड युनिट यांनी केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड
संकेतस्थळ :-**acbwebmail@mahapolice.gov.in**
ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in** 2):-**dyspacbbeed@gmail.com**
ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**
टोल फ्रि कमांक :- १०६४
दुरध्वनी कमांक :-०२४४२-२२२६४९
व्हॉटस अप क. :-९९३०९९७७००

स्वाक्षरीत
( बाळकृष्ण हनपुडे पाटील )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.